नि.दि.दा.क्र. १००/२०१८

शामराव वि. लक्ष्मण,

## नि.क्र. २३ लगत आदेश

(दि.२८.०३.२०२३)

१. प्रतिवादी क्र. ३ यांनी त्यांच्या विरुध्द झालेल्या विना लेखी व म्हणणे हा हुकूम रद्द होऊन मिळणेकरिता अर्ज दाखल केला आहे.

२. प्रतिवादी क्र. ३ चे असे कथन आहे की, सदर प्रकरणात त्यांची तब्येत बरोबर नसल्याने व जास्त हिंडता फिरता येत नसल्याने ते विहित मुदतीत लेखी जबाब सादर केला नाही तसेच दरम्यानचे काळात कोवीड प्रार्दुभावामुळे त्यांना लेखी जबाब दाखल करता आला नाही. तरी, झालेला उशिर माफ होऊन मिळावा व प्रतिवादीविरुध्द झालेला लेखी जबाब नाही हा हुकूम रद्द होऊन मिळावा करिता अर्ज असे.

३. सदर अर्जास वादीतर्फे वकिलांनी म्हणणे देऊन असे कथन केले आहे की, अर्जास विरोध आहे. योग्य तो आदेश पारित व्हावा.

४. अर्ज व म्हणणे वाचले. प्रकरण पडताळले. यातील प्रतिवादी क्र. ३ यांना दाव्याचे समन्स दि.२७.११.२०२१ रोजी मिळाले व ते दाव्यात दि. ०९.१२.२०२१ रोजी हजर झाले. त्यानंतर २३.०८.२०२२ रोजी प्रतिवादी क्र. ३ ने सदरचा अर्ज दाखल केला आहे. वस्तुतः दि.प्र.सं. आदेश ८ नियम १ मधील तरतुदींचा विचार करता समन्स मिळाल्यापासून प्रथम ३० दिवस व त्यानंतर ६० दिवसांपर्यंत लेखी जबाब व म्हणणे दाखल करण्यास मुदत आहे. अशास्थीतीत प्रतिवादींच्या सदर अर्जाचा विचार करता आणि झालेल्या ७ महिन्यांचा विलंबाच्या कारणाचा विचार करता सदरचा अर्ज दंडासह मंजुर केल्यास वादी यांच्यावर कोणताही पूर्वग्रह दुषित असा अन्याय होणार नाही. तसेच दाव्याच्या कामाकाजामध्ये देखिल कोणतीही गुंतागुंतीची परिस्थिती निर्माण होणार नाही. करिता, न्यायाच्या दृष्टीने मी खालीलप्रमाणे आदेश पारित करिता आहे :–

**आदेश**

१. अर्ज नि.क्र. २३ हा दंड रुपये ७००/– सह मंजुर करण्यात येत आहे.

२. दंडाची रक्कम रूपये ७००/– प्रतिवादी क्र. ३ नी वादीस पूढील तारखेस द्यावी. त्यानंतर प्रतिवादींचा लेखी जबाब अभिलेखावर घेतला जाईल.

स्वा/–

दि.२८.०३.२०२३.

शैलेश यु. कंठे

दिवाणी न्यायाधीश क.स्तर,

देऊळगावराजा.

मी रुपेश अशोक दांडगे, लघुलेखक, (दिवाणी न्यायालय, कनिष्ठ-स्तर, देऊळगावराजा, ता.देऊळगावराजा, जि. बुलडाणा.) याची पुष्टी करतो की, या पी.डी.एफ.ची सामग्री ही मुळ आदेशाच्या शब्दाप्रमाणेच शब्द आहे.